**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

१०० टक्के केंद्रशासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर स्कीम ऑफ स्कॉलरशिप फॉर कॉलेज ॲण्ड युनिव्हर्सिटी स्टुडंटस् सन २०१६-१७ बाबतचे मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक-उशिसं/१४ अई/सीएसएस/२०१६-१७/१०९६३, दि.२३ सप्टेंबर, २०१६ चे पत्र व जाहिरात आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यासाठी महाविद्यालयांनी जिल्हाधिकारी कार्यालयांशी संपर्क साधून महाविद्यालयात कॅम्प आयोजित करण्याबाबतची कार्यवाही करावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 141
दि. 10 OCT 2016

संलग्नता T-2

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

Web : www.dhepune.gov.in
E-mail : scholarshipcss@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९
फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्रमांक-उशिसं/१४ अई/सीएसएस/२०१६-१७./१०८६३
दिनांक- २३/०९/२०१६.
23 SEP 2016

परिपत्रक-

**विषय- १०० टक्के केंद्रशासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर स्कीम ऑफ स्कॉलरशिप फॉर कॉलेज ॲन्ड युनिव्हर्सिटी स्टुडंटस सन २०१६-१७.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे फेब्रुवारी/मार्च २०१६ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विदयाशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विदयार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यांत येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विदयार्थ्यांना घेता यावा यासाठी विदयार्थ्यांचे नवीन मंजुरी व प्रथम नूतनीकरणाचे अर्ज (Fresh & 1st renewal) हे ऑनलाईन पध्दतीने व शिष्यवृत्तीच्या द्वितीय, तृतीय व चतुर्थ (2nd/3rd/4th) नूतनीकरणासाठीचे अर्ज हे ऑफलाईन (Offline) पध्दतीने मागविण्यांत येत आहेत.

**नवीन मंजुरी व प्रथम नूतनीकरण**-(Online Renewal)- १) शिष्यवृत्तीच्या नवीन मंजुरी व प्रथम नूतनीकरणासाठी **(Fresh & 1st renewal)** विदयार्थ्याने ऑनलाईन पध्दतीने www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन अर्ज करणे आवश्यक आहे. २) विदयार्थ्याच्या अर्जासोबत आधारकार्ड असणे आवश्यक आहे व त्याचा आधारक्रमांक हा त्याच्या बँकखात्याशी संलग्न (link)असणे आवश्यक आहे. ३) नवीन मंजुरीचा व प्रथम नूतनीकरणाचा अर्ज करण्याच्या विस्तृत पध्दतीसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द जाहिरातींचे व सूचनांचे पालन करावे.

**शिष्यवृत्तीचे नूतनीकरण** -(Offline Renewal) -१. शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षीच्या परीक्षेत किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. २. द्वितीय, तृतीय व चतुर्थ नूतनीकरणासाठी (2nd/3rd/4th renewal) विदयार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठीचा अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावा व परिपूर्णरित्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह महाविदयालयाकडे दिनांक २०/१०/२०१६ पर्यंत जमा करावा. महाविदयालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र अर्ज दिनांक

NDP 03/10
30 SEP 2016
1053
4/10/16
Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2.
Inward No. 4595
Date 03/10/16

३०/१०/२०१६ पर्यंत संबंधित सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत. ४. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने पात्र विदयार्थ्यांची विहित नमुन्यातील यादी उच्च शिक्षण संचालनालयास दिनांक १५/११/२०१६ पर्यंत जमा करावी.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१६-१७ च्या मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य/संस्थाप्रमुख यांची असेल. **आपल्या अधिनस्थ महाविदयालयात/संस्थेत शिक्षण घेत असणा-या जास्तीत जास्त विदयार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी व बँकखाते आधार संलग्न करण्यासाठी प्रोत्साहन दयावे**.अर्जदाराच्या सोयीसाठी मार्गदर्शक सूचना व अर्जाचा नमुना www.dhepune.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेला आहे.

आपल्या अधिनस्थ महाविदयालये, शैक्षणिक संस्था व विदयापीठे यांचे स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विभागप्रमुखांना कार्यशाळा, बैठका आयोजित करुन सूचना देण्यांत याव्यांत व सदर कार्यशाळेत सर्व विदयार्थ्यांचे आधारकार्ड काढण्यासाठी महाविदयालयांनी जिल्हाधिकारी कार्यालयांशी संपर्क साधून महाविदयालयांत कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यांत याव्यांत. झालेल्या कार्यशाळा, बैठका आयोजित केल्याबाबतचे इतिवृत्त या संचालनालयास सादर करण्यांत यावे. सदर शिष्यवृत्तीच्या वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीचे प्रारुप सोबत जोडले आहे. तसेच यासंबंधीची सविस्तर जाहिरात www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ.व्ही.आर.मोरे),
शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य-मुंबई-१.
३. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर भांबुर्डा, पुणे-५.
४. प्रबंधक, नर्सिंग कौन्सिल, मुंबई.
५. संचालक, वैदयकीय शिक्षण संचालनालय, सीएसटी जवळ, मुंबई-१.
६. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराज्य राज्य, पुणे.
८. कुलसचिव, सर्व विदयापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान).

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१**

**भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरिता**
**सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७**

# जाहिरात

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी /मार्च २०१६ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि प्रथम नूतनीकरणाचे ($1^{st}$ renewal) अर्ज ऑनलाईन** (Online) **पध्दतीने व शिष्यवृत्तीच्या व्दितीय, तृतीय व चतुर्थ ( $2^{nd}$,$3^{rd}$ & $4^{th}$ ) नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑफलाईन**(Offline) **पध्दतीने** मागविण्यात येत आहेत.

**<u>नविन मंजूरी</u>** <u>(Fresh)</u>:-१.नवीन मंजूरीसाठी व प्रथम नूतनीकरणासाठी **($1^{st}$ renewal)** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने या **www.scholarships.gov.in**संकेतस्थळावरुन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. २. विदयार्थ्यांच्या अर्जासोबत आधारकार्ड असणे आवश्यक आहे व त्याचा आधारक्रमांक हा त्याच्या बँकखात्याश-
ी संलग्न [link] असणे आवश्यक आहे. ३. नवीन मंजूरीचा अर्ज करण्याच्या विस्तृत पध्दतीसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द जाहिरातीचे व सुचनांचे पालन करावे.

**शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Online** Renewal).- शिष्यवृत्तीच्या प्रथम नूतनीकरणासाठी ($1^{st}$ renewal) विदयार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीचे नूतनीकरण**(Offline Renewal) :-१ शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ६० % किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. २. व्दितीय, तृतीय व चतुर्थ नूतनीकरणासाठी ( **$2^{nd}$,$3^{rd}$ & $4^{th}$** Renewal) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठीचा अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाउनलोड करावा व परिपूर्णरीत्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह महाविद्यालयाकडे दि.२०/१०/२०१६ पर्यंत जमा करावा.
३. महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र अर्ज दि.३०/१०/२०१६ पर्यंत संबंधित सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत. ४. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने पात्र विद्यार्थ्यांची विहीत नमुन्यातील यादी उच्च शिक्षण संचालनालयास दि. १५/११/२०१६ पर्यंत जमा करावी. ५. विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**नवीन मंजूरी व प्रथम नूतनीकरणासाठी** (Fresh & $1^{st}$ renewal)
**ऑनलाईन** (Online)**अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक :**

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन ॲप्लिकेशन सिस्टीम पद्धतीने विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक (Fresh & $1^{st}$ renewal) | दि. ३०/०९/२०१६ |

योजनेची विस्तृत जाहिरात, नूतनीकरणाच्या **2nd ,3rd & 4th ऑफलाईन** (Offline) अर्जाचा नमुना, मार्गदर्शक सूचना विद्यार्थ्यांना www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण किंवा संचालक,उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे शिष्यवृत्ती विभाग यांचा दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर संपर्क साधावा.

**(डॉ. धनराज माने)**
नोडल ऑफिसर तथा शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१